# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक मूल्यांची माणगाव परिषद

**प्रा. तेजस धनपाल गवळी** (सहा. प्राध्यापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज, जि.सांगली

मो.नं – ७८४१८४९५३५ Email tejasgavali02 @gmail.com

---

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक एकता प्राप्त करण्यासाठी मानवमुक्ती चळवळ उभी केली त्यांचे व्यक्तित्व आणि कर्तुत्व हे क्रांतिदर्शी होते. त्यांनी भारत देशाला एकात्मतेचे महत्व पटवून दिले. वर्णव्यवस्थेवर आधारित जातीव्यवस्था मोडून काढली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे क्रांतीची मशाल होय त्यांनी आपल्या परिवर्तनवादी विचारांमुळे भारत देशात आमूलाग्र बदल घडवून आणले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २१ व २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथे 'दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद' संपन्न झाली. या घटनेला 'माणगाव परिषद' म्हणून ओळखले जाते. या परिषदेतून आंबेडकरी चळवळीचा प्रारंभ झाला. या परिषदेमधून मूलभूत मानवी हक्काची मागणी करणारे क्रांतिकारी विचार डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षीय भाषणातून मांडले त्यांनी या परिषदेसाठी जमलेल्या समुदायाला जागृत केले, सन्मानाने जगण्यासाठी प्रेरित केले. राजश्री छ. शाहू महाराज यांना अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी एक खंबीर कर्तृत्ववान नेता हवा होता तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने मिळाला याची साक्ष ही परिषद ठरते. भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे जातिभेद निर्माण झाला. कनिष्ठ जात- श्रेष्ठ जात असे वर्गीकरण करण्यात आले. या वर्गीकरणामुळे वरिष्ठ जातींनी कनिष्ठ जातींवर निर्बंध लादण्यात आले माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क आणि अधिकार कनिष्ठ म्हणून संबोधल्या जाणाऱ्या जाती कडून काढून घेण्यात आले. त्यांचे जीवन जनावरांपेक्षा हलाखीचे झाले. अशा पीडित, शोषित, वंचित, दलित, स्त्री, कामगार अशा लोक समूहास स्वातंत्र्य, सामाजिक समता, मानवतेचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवमुक्ती लढ्याची चळवळ सुरू केली. परिवर्तनाच्या क्रांतीची मशाल माणगाव परिषदेपासून सुरू झाली. पुढे जावून या चळवळीचे रूपांतर भारतीय संविधानात झाले. आंबेडकरी चळवळ व्यापक होत गेली वृत्तपत्र, परिषद, सत्याग्रह, आंदोलन, निषेधसभा, निवडणूक इत्यादी माध्यमातून त्यांनी मानवी स्वातंत्र्यासाठी कसून प्रयत्न केले.

**विषय संशोधनाची उद्दिष्टे**

१) माणगाव परिषद मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व भूमिका विषद करणे.

२) माणगाव परिषद मधून डॉ. आंबेडकर यांचा मानवमुक्ती लढा स्पष्ट करणे.

३) आंबेडकरी चळवळीतून मानवी जीवनात झालेला आमूलाग्र बदल स्पष्ट करणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या माणगाव परिषदेतील संविधानिक मूल्यांचा शोध घेणे

**संशोधन विषयाची व्याप्ती**

विश्वरत्न, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा उपाधी आपण त्यांना देतो सामाजिक समानतेच्या चळवळीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. मातीतून आकाशी झेप घेण्याचा प्रवास त्यांचा प्रेरणादायी आहे त्यांनी आपले उच्च शिक्षण अमेरिका आणि इंग्लंड या देशात पूर्ण केले. उच्च विभूषित होऊन ते भारतात आल्यानंतर त्यांना जातिभेद मोडून काढायचा होता स्वातंत्र्य, समता, बंधुता हे मूल्य भारत देशात निर्माण करायची होती हे स्वप्न मनाशी बाळवून आयुष्यभर संघर्षमय लढा देत राहिले.

आपल्या संस्थानात जातीअंतासाठी झटणारे राजश्री छ.शाहू महाराज यांनी डॉ.आंबेडकर यांची भेट घेतली त्यांनी या तरुणामध्ये असणारी प्रतिभा ओळखली. असा विश्वास झाला की, एक दिवस संपूर्ण भारत देशाला योग्य मार्ग दाखवेल. पीडित लोकांना न्याय मिळवून देईल अशी खात्री झाली. म्हणून त्यांनी माणगाव परिषदेसाठी डॉ. आंबेडकर यांना अध्यक्ष म्हणून आमंत्रित केले. माणगाव परिषदेमधून डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची सुरुवात झाली. पुढे जावून भारतीय संविधानात या परिषदेचे ठसे उमटून येतात म्हणून या माणगाव परिषदेचे महत्व ऐतिहासिक आहे. या विषयाच्या अनुषंगाने माणगाव परिषदेतून डॉ. आंबेडकर यांच्या विचारातून परिवर्तन झालेल्या लोक जीवनाचा आढावा घेतला जाईल. डॉ. आंबेडकर यांच्या परिषदेतील भाषणाचा सूक्ष्म अभ्यास केला जाईल.

**माणगाव परिषद पूर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते त्यांच्या आंबेडकरी चळवळीमुळे या विषमतावादी विचारसरणीचा नाश करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता अशी संविधानिक मूल्य प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजू केली. या चळवळीची सुरुवात माणगाव परिषद मधून झाली. भारतीय समाज व्यवस्था ही विषमतावादी होती. अस्पृश्यतेमुळे पीडित लोकांचे जगणे हे कठीण झाले होते. बाबासाहेबांना ते बदलायचे होते म्हणून उच्च शिक्षण घेणे त्यांना गरजेचे वाटले. कारण शिक्षणामुळे क्रांती होऊ शकते असा विश्वास त्यांचा होता. उच्च शिक्षणासाठी ते परदेशी जाण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांना सयाजीराव

गायकवाड महाराजांनी शिष्यवृत्ती दिली. दि.२० जुलै १९१३ साली कोलंबिया विद्यापीठात एम.ए पदवीसाठी राज्यशास्त्र विद्याशाखेत प्रवेश घेतला. १९१५ मध्ये अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या विषयातून एम.ए पदवी प्राप्त केली. मानववंशशास्त्र सेमिनार मध्ये बाबासाहेबांनी 'Castes in India' या विषयावर शोधनिबंध सादर केला. या निबंधातून जाती व्यवस्था कशी निर्माण झाली, कशी राबवली जाते याचा आढावा घेतला. या निबंधातून डॉ. आंबेडकर प्रचलित झाले. अमेरिकेतील 'Journal Of Sociology' या संशोधन पत्रिकेने या निबंधाची दखल "Top most literature of the world in the month" या शीर्षकाने 'Castes in India' या निबंधाची दखल घेतली.

प्रोफेसर सेलिग्मन हे बाबासाहेबांच्या पीएच.डी प्रबंधाचे मार्गदर्शक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९१६ " The Evolution of Provincial Finance in British India " या त्यांच्या प्रबंधास पीएच.डी पदवीने सन्मानित केले. या यशानंतर ते इंग्लंडला गेले 'London school of economics and political science' या स्कूलमध्ये प्रवेश घेतला. सन १९१६ मध्ये स्कॉलरशिपची मुदत संपल्यानंतर त्यांना भारतात परतावे लागले. सप्टेंबर १९१७ मध्ये बडोदा संस्थानात मिलिटरी सेक्रेटरी म्हणून नोकरी केली. पण अस्पृश्यतेचे भयंकर अनुभव त्यांना आले म्हणून ते नोकरी सोडून मुंबईला परत आले. 'Small Holdings In India And Thair Remedies' या निबंधातून भारतातील छोट्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उपाय सुचविले यावेळी ते मुंबईच्या सिडन हॅम कॉलेजात प्रोफेसर म्हणून कार्यरत होते. १५ मार्च १९२० ला ते पुन्हा उर्वरित शिक्षणासाठी लंडनला गेले 'बार ऑट लॉ' साठी 'ग्रेज इन' या संस्थेत प्रवेश घेतला. बासाहेबांच्या राजकीय क्षेत्राततील प्रवेश सन १९१९ च्या 'साउथ बरो कमिशनला' निवेदन देण्यापासून झाला. साऊथ बरो कमिटी समोर बाबासाहेबांनी पहिल्यांदा लोकसंख्येच्या आधारे प्रतिनिधित्व दिले जावे. अशी भूमिका मांडली गव्हर्नरला पत्र लिहून अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करण्याची परवानगी मागितली. बाबासाहेबांचे राजकीय हालचालीवर बारीक लक्ष होते. काँग्रेसच्या अधिवेशनात सामाजिक प्रश्नांना बगल दिली जात असायची म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'टाइम्स' या पत्रातून 'महार' या टोपण नावाने 'Mahar on home rule' हा लेख लिहून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली त्यात ते म्हणाले " हे हिंदू लोक स्वतःच्या घरातील घाण साफ करून टाकायला अजून तयार नाहीत तर त्यांनी स्वराज्य का मागावे, स्वातंत्र्य मिळविणे हा टिळकांचा नव्हे तर महारांचा देखील जन्मसिद्ध हक्क आहे " अशी परखड भूमिका त्यांनी मांडली. छ. शाहू महाराजांनी तो लेख वाचला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरती भलतेच खुश झाले. या तरुणांमध्ये एवढी प्रतिभा आहे की, तो ही समाजव्यवस्थाच बदलून टाकेल असा विश्वास जडला. म्हणून १७ डिसेंबर १९१९ मुंबईमध्ये डॉ. आंबेडकर यांना भेटण्यासाठी गेले. त्या भेटी दरम्यान अस्पृश्यउद्धाराची चर्चा केली. डॉ. आंबेडकर यांना स्वतःचे वृत्तपत्र काढायचे होते. त्यास शाहू महाराजांनी २५०० रुपये ची मदत केली. शाहू महाराजांना आपल्या संस्थानात अस्पृश्य उद्धाराची परिषद घ्यायची होती. म्हणून त्यांनी डॉ. आंबेडकर यांना माणगाव परिषदेमध्ये अध्यक्ष म्हणून आमंत्रित केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माणगाव परिषद**

२१ व २२ मार्च १९२० रोजी 'दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद' माणगाव येथे संपन्न झाली. या परिषदेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष होते. छ.शाहू महाराज यांच्या संकल्पनेतून ही परिषद घेण्यात आली. शाहू महाराज अभिमानाने म्हणाले की, " डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत इतकेच नव्हे तर एक वेळ अशी येईल की, ते सर्व हिंदुस्थानाचे पुढारी होतील. अशी मनोदेवता मला सांगते" डॉ. आंबेडकर पीडित लोकांना एक दिवस गुलामगिरीच्या बेडीतून मुक्त करतील हा विश्वास 'भारतीय संविधान' निर्माण करुन डॉ. आंबेडकर खरा ठरविला.

डॉ.आंबेडकर यांच्या माणगाव परिषदेतील भाषणातून लोकशाही राज्यव्यवस्था, सांविधानिक मूल्ये देशात अमलात यावी यासाठीचे प्रयत्न दिसून येतात, आधुनिक भारताची मांडणी करताना दिसून येतात. भाषणाच्या सुरुवातीस माणगाव गावच्या लोकांचे आणि छ. शाहू महाराजांचे कौतुक करतात त्यांना ही परिषद अपूर्व वाटते. कारण ही परिषद माणगाव मध्ये संपन्न व्हावी म्हणून शाहू महाराज आणि त्याकाळी अस्पृश्य समाज म्हणून संबोधल्या गेलेल्या त्या समाजातल्या लोकांनी विपुल प्रयत्न केले होते. अस्पृश्यता सारखा कलंक आमच्या संस्थानातून, गावातून कायमचा नष्ट व्हावा यासाठी परिषद मधून केलेला प्रयत्न दिसून येतो. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात "आपल्या लोकात आपल्या उन्नतीबद्दल दिसून येत असलेली कळकळदेखील तितकीच अपूर्व आहे त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गात दिसून येत असलेली विचारक्रांतीही तशीच अपूर्व आहे" पुढे ते म्हणतात "आपल्या लोकांस वाटत होते की, आपली वाईट स्थिती होण्याचे कारण आपले दुर्भाग्य होय आणि दुर्भाग्याला आळा घालणे आपल्या हाती नसल्याकारणाने, आहे ती बिकट स्थिती आपण निमूटपणे सोसली पाहिजे हल्लीच्या पिढीला मात्र आपली परिस्थिती ईश्वरी लिलेचा परिपाक आहे असे वाटत नसून, ती इतरांच्या दुष्कृत्यांचा परिणाम आहे, असे वाटू लागले आहे" आज पर्यंत वर्णव्यवस्थेने देवाच्या नावाखाली आपली सोय करुन घेतली. स्वार्थी कर्मठ लोकांनी सत्ता आपल्या हाती ठेवली. ईश्वरीलीला म्हणून स्वर्ग-नर्क, पाप-पुण्य अशा गोष्टींना बडावा देऊन अस्पृश्यता निर्माण केली. खालच्या जातीचे लोक म्हणून मानवी अधिकारांपासून दूर ठेवून हीन वागणूक दिली. पण हे सर्व आपण कायमचे नष्ट करू शकतो, ही वर्णव्यवस्था मोडून काढू शकतो, मानवी हक्क मिळवू शकतो, अनिष्ठ प्रथांना बळी न पडता त्याविरुद्ध आपण लढले पाहिजे, आपली प्रगती केली पाहिजे, स्वतःला सिद्ध केले पाहिजे असे जमलेल्या समुदायाचे मनोबल वाढवण्यासाठी डॉ. आंबेडकर व्यक्त होतात.

हिंदू धर्माचे वर्गीकरण केले गेले आहे हे वर्गीकरण जन्मसिद्ध योग्ययोग्यता व दुसरे जन्मसिद्धता पवित्रापवित्रता या दोन तत्वानुरूप हिंदू लोकांची विभागणी केली तर तीन वर्ग पडतात १) जन्माने सर्वात श्रेष्ठ व पवित्र, ज्याला आपण ब्राह्मण वर्ग म्हणतो तो.

२) ज्यांची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणांपेक्षा कमी दर्जाची आहे असा तो वर्ग ब्राह्मणेतर वर्ग. ३) जे जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र आहेत अशांचा जो वर्ग तो आपला बहिष्कृत वर्ग. डॉ. आंबेडकर सूक्ष्म पद्धतीने या वर्गीकरणाबद्दल विचार मांडतात. या वर्गीकरणामुळे जातीयता वाढली. कोणत्या जातीत जन्माला यावे हे कोणाच्याही हातात नसते पण, या वर्गीकरणामुळे जन्मताचं अस्पृशतेची नाळ जोडली जाते. तेथून पुढे आयुष्य गुलामीत जगावे लागते. जातीयतामुळे मानवी हक्क अधिकार गमावून बसतात, सामाजिक दृष्ट्या मागास ठरतात. त्यांना शाळेत जाण्याचा अधिकार नसतो, सार्वजनिक विहिरी-तलाव मधील पाणी भरता येत नाही, रस्त्यावर मुक्तपणे वावरता येत नाही, कार्यक्रमास उपस्थित राहता येत नाही, सार्वजनिक भोजनालय मध्ये भोजन करता येत नाही असे अनेक बंधने त्यांच्यावर लादली जातात. या बंधनांमुळे सर्व सुख सुविधांपासून वंचित रहावे लागते ही गोष्ट बाबासाहेबांना खूप त्रासदायक वाटते म्हणून या वर्णव्यवस्थेविरुद्ध कडाडून विरोध आपल्या भाषणातून करतात.

डॉ. आंबेडकर जातीव्यवस्था मुळे होणारे नुकसाणी बद्दल म्हणतात की, " जन्मसिद्ध अयोग्यतेमुळे व अपवित्रतेमुळे आर्थिकदृष्ट्या त्यांचे नुकसान झाले आहे. व्यापार, नोकरी, शेती असे धनसंचयाचे तीन मार्ग आहेत, ते खुले नाहीत विटाळामुळे गिऱ्हाईक मिळत नसल्याकारणाने त्यांना व्यापार करण्याची सोय उरली नाही. शिवाशिवीमुळे त्यांना नोकरी मिळत नाही" अशा कारणांमुळे समाज मागे पडला आहे. वर्णव्यवस्था आपणास आपली उन्नती करू देत नाही, पुढे जाऊ देत नाही, जातीय वर्गीकरण आपणास पिढ्या आणि पिढ्या बरबाद करू शकते येणारी पिढीही गुलाम होईल. तिचं जगणं कठीण होईल. असे मत या परिषद मधून व्यक्त करतात. त्यांनी भविष्यकाळाचा वेध घेऊन मांडलेले चिंतन इथे महत्वाचे ठरते. अशा गोष्टींवर भाष्य करून त्यांनी लोकांना जाणीव करुन दिली जगण्याचे सत्य सांगितले, अशा गोष्टी आपण पाळू लागलो तर एक दिवस आपला नाश होईल ! यातून बाहेर पडायचे असेल स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर ते मार्गही सांगतात. " आपण राजकीय सामर्थ्य संपादिले पाहिजे जातवार प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती राजकीय सामर्थ्य येणार नाही 'सत्यमेव जयते' हे तत्व पोकळ आहे. सत्याचा जय होण्यासाठी आपण आपली चळवळ कायम ठेवली पाहिजे " असे भाषणाच्या शेवटी मूळ मुद्द्यावर येतात बाबासाहेबांना समजले होते की, राजकीय सामर्थ्याशिवाय आपणास स्वातंत्र्य मिळणार नाही. सत्ता संपादन झाली तरचं नवा भारत निर्माण होऊ शकतो. राजकीय सत्तेमुळे अधिकार मिळतील तेव्हा खऱ्या अर्थाने सत्याच्या जय होईल असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

आजपर्यंत जे अनुभवले, भोगले, सोसले त्याचा सारासार त्यांच्या भाषणातून येतो त्यांना या देशातून समाजातील जातीय विषमता, अस्पृश्यता असे अनेक भेदाभेद नष्ट व्हावेत प्रत्येक माणसाला न्यायाने, स्वाभिमानाने जगण्याचा हक्क मिळावा यासाठी दुर्बल, वंचित , उपेक्षित बांधवांना शिका, संघटित व्हा, संघर्ष करा अशी शिकवण परिषदेतून देतात. वंचितांना हक्क मिळवून देण्याची तळमळ त्यांच्या भाषणातून दिसून येते. त्यांनी परिषदेतून मानवी हक्काची मागणी करतात. सार्वजनिक रस्ते, विहिरी, तलाव, शाळा, मंदिर, करमणुकीच्या जागा, भोजनालय,वाहने इ. सोयींचा आपणास उपभोग घेण्याचा अधिकार आहे त्यामुळे हे अधिकार आपण मिळविले पाहिजेत त्यासाठी आपण संघर्ष केला पाहिजे. असे बाबासाहेब आंबेडकर परिषदेतून आवाहन करतात. आपली प्रगती शिक्षणामुळे होऊ शकते म्हणून आपल्या समाजातील प्रत्येक मुला-मुलींनी भेदभावाला न जुमानता शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणामुळे आपली योग्यता सिद्ध होईल सरकारी नोकरी मिळेल, सन्मानाने जगता येईल असे अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडतात. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा, मेलेले जनावर ओढणे बंद करा, कोणाचे चाकर म्हणून राहू नका, अशी निष्कृष्ट दर्जाची कामे करू नका असा संदेश देतात. परिषदेच्या माध्यमातून ते सरकारकडे काही मागण्या करतात अस्पृश्य लोकांच्या उन्नतीसाठी त्यांना नोकरीमध्ये आरक्षण मिळायला पाहिजे. सरकारी शाळा, कॉलेजमध्ये शिक्षक, प्राध्यापक म्हणून भरती झाली पाहिजे, सरकारी कार्यालयात भरती झाली पाहिजे जेणेकरून समानता येण्यास वेळ लागणार नाही.

**सर्वव्यापी डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातून जमलेला समुदाय प्रेरित झाला. त्यांना अभिमान वाटू लागला की, आपल्यातील एक तरुण विलायतेस जाऊन उच्च शिक्षण घेतो. सामाजिक व राजकीय जडणघडणी साठी प्रयत्न करतो यांच्यासारखे आपणही शिकलं पाहिजे अशी इच्छा प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली डॉ. आंबेडकरांची प्रेरणा घेवून अस्पृश्य समाज शिकू लागला. अस्पृश्यतेचे सर्व नियम मोडीत काढू लागला डॉ. आंबेडकरांनी केलेल्या आवाहन मुळे मेलेल्या जनवरांचे मास खाने सोडले, मेलेली जनावरे ओढणे बंद केले. मानवमुक्ती चळवळीत सहभागी होऊ लागले. त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊ लागला.

डॉ.आंबेडकर यांची संविधानिक चळवळ अधिक व्यापक होत गेली. महाड चवदार तळ सत्याग्रह, मनुस्मृती ग्रंथ दहन, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, मुखेडचा सत्याग्रह, पुणे करार, येवला परिषद, स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना, मजूर मंत्री, पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापना, संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष, कायदेमंत्री, हिंदू कोड बिल, धर्मांतर, पत्रकारिता ( मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत ) अशा अनेक देश हिताच्या गोष्टी त्यांनी केल्या त्यांच्या सर्वव्यापी कार्यामुळे महामानव म्हणून संबोधले जाते. माणगाव परिषदेमध्ये शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या बद्दल केलेले भाकीत की, " आंबेडकर एक दिवस संपूर्ण हिंदुस्थानाचे पुढारी होतील " हे खरे ठरले.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली माणगाव परिषद संपन्न झाली. छ. शाहू महाराजांची दूरदृष्टी महत्त्वाची ठरली. या परिषदेत डॉ. आंबेडकर यांच्या भाषणाचा प्रभाव सर्वत्रव्यापी झाला. डॉ. आंबेडकर चळवळीचा पाया माणगाव परिषद ठरली. या परिषद मधून भारतातील वर्णव्यवस्थाविरुद्ध आवाज उठवला, मानवी हक्काची मागणी केली. अनिष्ट, रूढी, परंपरा, प्रथा, जातीभेद अशा मानवी जीवनाला कलंक ठरलेल्या व्यवस्थेला आळा घालून मानवी स्वातंत्र्याची मागणी या परिषदेने केली. विकृत समाज व्यवस्थेला विरोध केला. समाजातील अस्पृश्य, बहिष्कृत लोकांच्या मनात सामाजिक, धार्मिक गुलामगिरी विरुद्ध क्रांतीचे बीजे पेरली विसाव्या शतकात मानवी हक्क अधिकारांसाठी क्रांतिकारी संघर्षीची पायाभरणी डॉ. आंबेडकर यांच्या संविधानिक मूल्यांची मागणी करणारी माणगाव परिषद ठरली.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, १९६६
2. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : संपादक – डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, जानेवारी २००१
3. मी आणि माणगाव परिषद : प्रज्ञावंत गौतम, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.२००८
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक : वसंत मून, महाराष्ट्र शासन, मुंबई १९९०
5. पहिली महार परिषद (ऐतिहासिक ठराव) : प्रज्ञावंत गौतम, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.२००७
6. माणगाव परिषद शतकोत्तर चिंतन : संपादक – प्रा. उज्ज्वला देसाई, डॉ. गिरीश मोरे, डॉ. सरीपुत्र तुपेरे, भारती मुद्रणालय, २०२२